3 I.O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकींकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** पंढरपूर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0307 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/05/2024 16:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुंन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 09/05/2024

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/05/2024

**Time From (वेळेपासून):** 13:54 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 09:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/05/2024 **Time (वेळ):** 15:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/05/2024 16:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंढरपूर शहर पोलीस ठाणे आवारात , व पोलीस संकुल पंढरपुर,पंढरपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सोमनाथ भगवान सलगर

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** भगवान सलगर

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2001

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो भटुंबरे, ता पंढरपूर,पंढरपूर तालुका,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो भटुंबरे, ता पंढरपूर,पंढरपूर तालुका,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9834684345

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोना 380 वैजिनाथ संदिपान कुंभार | | वडील का नाम : संदिपान कुंभार | 1. नेम -पंढरपूर शहर पोलीस ठाणे, वाहतुक शाखा विभाग,पंढरपुर, पंढरपूर शहर ,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्यां मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि:- 10/05/2024

मी सोमनाथ भगवान सलगर वय 23 वर्षे, व्यवसाय – काव्या चायनिज सेंटर, रा. मु. पो. भटुंबरे, ता. पंढरपूर जि. सोलापूर. (शिक्षण – 8 वी ) मो.नं. 9834684345, 9860843599 समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की, मी दि. 09/05/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक, श्री उमाकांत महाडिक यांचेशी संपर्क साधुन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला दि. 09/05/2024 रोजी 13.30 वा. पंढरपूर येथील 65 एकर मैदान येथे येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी येवुन थांबलो असता तेथे काही वेळातच पोनि महाडिक हे शासकीय वाहनाने आले. तेथे पोनि महाडिक यांनी मला वाहनात बसण्यास सांगुन वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करुन दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतले की,

पंढरपूर शहर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, येथे गु.र.नं. 44/2024, भा.द.वि. कलम 279,337,338 सह मोटार वाहन अधिनियम 1988 चे कलम 134 (ए), 134 (बी), 177, 184 प्रमाणे अज्ञात मोटार सायकल विरुध्द गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयामध्ये माझी मोटार सायकल न दाखविण्याकरीता तसेच गुन्हयामध्ये मला आरोपी न करण्याकरीता पंढरपूर शहर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथील वाहतुक शाखेचे पोलीस अंमलदार श्री कुंभार हे 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करीत असुन पोलीस अंमलदार श्री कुंभार यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी मला माझी तक्रार स्वहस्त:क्षरात लिहुन देण्यास सांगीतली असता मला लिहीता येत नसल्याबाबत मी त्यांना सांगीतले त्यावरुन पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन पंच 02 पवार यांनी माझे सांगणेप्रमाणे माझी तक्रार लिहुन दिली.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहीत मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. पोलीस अंमलदार कुंभार यांनी मला पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे बोलाविले असल्याने सदर ठिकाणी पंच 01 यांचेसह जावुन पोलीस अंमलदार कुंभार यांच्यावर पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. त्याअनुषंगाने पोनि महाडिक यांनी मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळ्यात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्या मोटारसायकलवरुन पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे पाठविले. त्याप्रमाणे आम्ही पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे आत गेलो. तेथे पोलीस अंमलदार कुंभार हे दिसुन न आल्याने मी माझा मो.क्रं. 9860843599 वरुन कुंभार यांचा मो. क्रं. 9922147376 वर फोन केला असता कुंभार यांनी फोन रिसिव्ह करुन पोलीस ठाणे येथील खोलीमधुन बाहेर आले व मला बघुन तुला मस्ती आली का असे म्हणुन रागवु लागले. त्यानंतर मला व पंच यांना पोलीस ठाणे आवारातील एक पत्र्याच्या शेडकडे घेवुन जावून आत मध्ये लावलेली माझी शाईन मोटार सायकल क्रं. एम एच 13 सी डब्लु 5728 दाखविली.

त्यानंतर सदर ठिकाणी कुंभार हे माझ्या गाडीने जानेवारी मध्ये झालेल्या अपघातामध्ये मला आरोपी करुन लगेच अटक करतो असे म्हणु लागले. व हाताने पैश्याचा इशारा करीत काय करायचे सांग आता असे म्हणाले त्यावर मी त्यांना बोला की असे म्हणालो असता तुला तवाच सांगीतलो की, असे म्हणाले. पोलीस अंमलदार कुंभार यांनी मला यापुर्वी 01 लाख रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती त्यामुळे मी त्यांना लाख रुपये माझ्याकडे नसल्याबाबत सागुन तडजोड करण्याचा प्रयत्न केला. त्यावर कुंभार यांनी माझ्याकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी केली. आजच दुपारी 04.00 वा. पावेतो घेवुन येण्यास सांगीतले. त्यावर मी होकार देवुन पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण खात्री केली.

त्यानंतर पोलीस अंमलदार कुंभार य च्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी माझ्याकडे

आवश्यक लाच रक्कम 50,000/- रुपयांची मागणी केली. परंतु सदरवेळी माझ्याकडे काहीच रक्कम नसल्याने मी माझ्या मित्राकडुन घेवुन येतो असे पोनि महाडिक यांना सांगुन मित्राकडुन घेवुन येण्याकरीता तेथुन निघुन गेलो. त्यानंतर मी लाच रक्कमेची जमवाजमव करीत असतेवेळी मला पोलीस अंमलदार कुंभार यांचा फोन आला व त्यांनी मला पैश्याबाबत विचारले त्यावर मी त्यांना रक्कम मोठी असुन जमवाजमव करीत असल्याबाबत सांगीतले. त्यावर कुंभार यांनी ते दि. 10/05/2024 रोजी इलेक्शन बंदोबस्त करीता जाणार असुन मला सकाळी 09.00 वा. लाच रक्कम घेवुन पोलीस ठाणे येथे येण्यास सांगीतले. त्यामुळे मी पुन्हा पोनि महाडिक यांचेकडे जावुन त्यांना तसेच पंच यांना कुंभार यांच्या आलेल्या फोनबाबत हकीकत सांगीतली.

पोलीस अंमलदार कुंभार यांनी मला लाच रक्कम घेवुन दि. 10/05/2024 रोजी सकाळी 09:00 वा. पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे येण्यास सांगीतले असल्याने पोनि महाडिक यांनी सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगीत केली.

दि. 10/05/2024 रोजी पोनि महाडिक यांचे सुचनेप्रमाणे मी सकाळी 8.30 वा. पंढरपूर येथील 65 एकर मैदान येथे उपस्थित झालो. तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने उपस्थित झाले. व तेथे वाहनात दि. 09/05/2024 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम केलेले दोन्ही पंच उपस्थित होते. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर शासकीय वाहनात सापळा कारवाईच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही पुर्ण केली. व पोलीस अंमलदार कुंभार यांचेवर सापळा कारवाई करीता आवश्यक 50,000/- रुपयांची मागणी केली परंतु माझ्याकडे फक्त 10,000/- रुपयेच झाले असल्याबाबत मी पोनि महाडिक यांना सांगीतले. त्यावर पोनि महाडिक यांनी उर्वरीत 40,000/- रु. हे खेळण्यातले नोटा वापरण्याचे ठरविले. त्याअनुषंगाने मी हजर केलेली लाच रक्कम 10,000/- रुपयांच्या नोटांना तसेच 40,000/- रुपयांच्या खेळण्यातील नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन त्याच्या दोन्ही बाजुस रबर बॅन्ड लावुन सदरच्या नोटांचा बंडल माझ्या नेसते पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवण्यात आले.

त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. पोलीस अंमलदार कुंभार यांनी मला लाच रक्कम घेवुन पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे येण्यास सांगीतले असल्याने प्रथम त्यांना फोन करुन ते पोलीस ठाणे येथे आहेत का याबाबत खात्री करण्याचे ठरविण्यात आले. त्याअनुषंगाने मी पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन माझ्या मोबाईल क्रं. वरुन कुंभार यांचे मोबाईलवर फोन करुन कोठे येवु असे विचारले असता, कुंभार यांनी ते पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे असल्याबाबत सांगीतले. त्यामुळे कुंभार यांचेवर पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे सापळा कारवाई करण्याकरीता पोनि महाडिक यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन येवुन पंढरपूर शहर पोलीस ठाणे परिसरात सापळा लावुन थांबले.

मी व पंच 01 असे पंढरपूर शहर पोलीस ठाणेचे गेट समोर जावुन कुंभार यांना फोन केला तो फोन रिसिव्ह करुन कुंभार यांनी मला कुठे आहे असे विचारले त्यावर मी त्यांना बाहेर थांबलो असे सांगीतले. त्यावर कुंभार हे माझ्याकडे येवुन माझ्या मोटार सायकलवर पुढे बसले व मला त्यांचे पाठीमागे बसवुन पंढरपूर शहर पोलीस ठाणे समोरुन काही अंतरावर असलेल्या पोलीस संकुल येथे आत मध्ये घेवुन गेले. आमचे पाठीमागे पोनि महाडिक पंच 02 व सापळा पथक असे येवुन सदर परीसरात सापळा लावुन थांबले.

सदर ठिकाणी कुंभार यांनी माझ्याकडे पैश्याची मागणी केली त्यावर मी त्यांना माझे नेसते पॅन्टच्या समोरील उजव्या खिशातील लाच रक्कम काढुन त्यांचे समोर धरली सदरची रक्कम कुंभार यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे नेसते पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी व कुंभार असे संकुल इमारतीमधुन बाहेर येत असताना मी, पोनि महाडिक, व सापळा पथकास दिसेल असा लाच स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला त्यावरुन पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन पोलीस अंमलदार कुंभार यांना पकडले.

सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी पोलीस अंमलदार कुंभार यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव वैजिनाथ संदिपान कुंभार, वय 52 वर्षे, पद – पोना / 380, सध्या नेम. पंढरपूर शहर पोलीस ठाणे, वाहतुक शाखा विभाग, सोलापूर ग्रामीण, रा. अर्थव बिल्डींग, ब्लॉक नं. 207, पुजारी सिटी, इसबावी पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर असे असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी वाहनामध्ये लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह, पंढरपूर येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 09/05/2024 रोजीचे 13.54 ते दि. 10/05/2024 रोजीचे 09.38 वा. च्या दरम्यान आरोपी

लोकसेवक वैजिनाथ संदिपान कुंभार, वय 52 वर्षे, पद - पोना / 380, सध्या नेम. पंढरपूर शहर पोलीस ठाणे, वाहतुक शाखा विभाग, सोलापूर ग्रामीण, यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरूपयोग करून पंढरपूर शहर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, येथे गु.र.नं. 44/2024, भा.द.वि. कलम 279,337,338 सह मोटार वाहन अधिनियम 1988 चे कलम 134 (ए), 134 (बी), 177, 184 प्रमाणे अज्ञात वाहनाविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयामध्ये माझी मोटार सायकल न दाखविण्याकरीता तसेच सदर गुन्हयामध्ये मला आरोपी न करण्याकरीता पंढरपूर शहर पोलीस ठाणे आवारात 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 50,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली. व सदरची लाच रक्कम पोलीस संकुल पंढरपूर येथे स्वीकारली आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक वैजिनाथ संदिपान कुंभार, वय 52 वर्षे, पद - पोना / 380, सध्या नेम. पंढरपूर शहर पोलीस ठाणे, वाहतुक शाखा विभाग, सोलापूर ग्रामीण, यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंन्ट काढल्यानंतर पंच क्रं. 02 पवार यांनी मला वाचुन दाखविला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

( उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो सोलापुर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

vishvjeet bhagvanrao ghodke(I (Inspector)) / DCPS15101000402VBGM8101I **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पंढरपूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** vishvjeet bhagvanra
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DCPS15101000402VBG